# जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील मौजे वाकड येथील स.नं. १२६ व १७६ मधील पुर्व-पश्चिम २४ मी. रस्ता आखणीनुसार पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाचे नियोजन नियंत्रणाखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आलेल्या मौजे थेरगाव येथील स.नं. १७ मधील प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील २४ मी. नियोजीत रस्त्यापर्यंत २४ मी. प्रमाणे रस्ता प्रस्तावित करण्यास व सदर रस्ता त्यापुढे जागेवरील अस्तित्वातील रस्त्यास ९.० मी. प्रमाणे रस्ता रुंदी प्राधिकरणाचे विकास योजनेतील २४ मी. रस्त्यापर्यंत (दक्षिणोत्तर थेरगाव वाकड येथील दत्त मंदीर रस्त्यापर्यंत) कायम करावयाची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेच्या मा. "ब" प्रभाग समिती ठराव क्र. ७५, दि. २२/१२/२०१६ रोजीच्या ठरावास मा. "ग" प्रभाग समिती ठराव क्र. १८, दि. ०१/०१/२०१८ अन्वये सुधारणा प्रस्तावित केली.

सबब मा. ग प्रभाग समितीचे ठराव क्र. १८ दि. ०१/०१/२०१८ चे ठरावानुसार मौजे थेरगाव येथील स.नं. १७ मधील प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील २४ मी. नियोजीत रस्त्यापर्यंत २४ मी. प्रमाणे रस्ता प्रस्तावित करण्यास व सदर रस्ता त्यापुढे जागेवरील अस्तित्वातील रस्त्यास ९.० मी. प्रमाणे रस्ता रुंदी प्राधिकरणाचे विकास योजनेतील २४ मी. रस्त्यापर्यंत (दक्षिणोत्तर थेरगाव वाकड येथील दत्त मंदीर रस्त्यापर्यंत) कायम करण्याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी मान्यता आहे. त्यानुसार सदर रस्ता घोषित करावयाचा आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांवर योग्य तो विचार करून रस्ता अंतिमत: घोषित करण्याची कार्यवाही केली जाईल. उक्त मुदतीनंतर प्राप्त आलेल्या कोणत्याही हरकत/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

स्थळ – पिंपरी, पुणे

दि. -29 / ०७/२०१८

जाहिरात क्रमांक ६६